जानेवारी २००५

# पतसंस्थांच्या लेखापरिक्षणांची परिक्षा

३१ मार्च २००५ ही तारीख २ महिन्यांवर आलेली आहे. नागरी सहकारी पतसंस्थांसाठी व इतर सहकारी संस्थांसाठी सुध्दा या तारखेचे अनन्य साधारण महत्त्व आहे. प्रामुख्याने पतसंस्थांना ३१ मार्च २००५ रोजी संपणाऱ्या वर्षाअखेरीस ताळेबंद व नफा-तोटा पत्रक कसे आदर्शवत, व मार्गदर्शक स्वरूपाचे असेल याची परिक्षा लेखापरिक्षण व त्याद्वारे मिळणाऱ्या वर्गवारीवरून होते. व त्यात उत्तीर्ण होते व उत्तीर्ण होऊन वरचा वर्ग मिळणे यासाठी यथाशक्ति व काळजीपुर्वक बघणे आवश्यक आहे.

एखाद्या पतसंस्थेची थकबाकी अत्यल्प असली तरी **''अ स्टार'' ''अ'' किंवा ''ब''** वर्ग लेखापरिक्षणाद्वारे मिळेलच याची खात्री नसते. कारण वसुल भाग-भांडवल व ठेवीत किती वाढ होणे आवश्यक आहे, हे कार्यकर्त्यांना माहिती असणे आवश्यक आहे. व माहिती असूनही त्या दिशेने पाऊले उचलून पुर्तता करणे आवश्यक आहे. वसुल भाग - भांडवलामध्ये गत सालच्या भाग भांडवलापेक्षा २५ % वाढ किंवा त्या सालच्या एकूण खेळत्या भांडवलाची १० % एवढी यापैकी जी रक्कम अधिक असेल तेवढी रक्कम वसुल भाग-भांडवल म्हणून वाढणे आवश्यक आहे. **तरच एकूण २०० गुणांपैकी १० गुण आपल्या पतसंस्थेस मिळतील.** शिवाय ही वाढ १४% पर्यंत असल्यास १० गुणांच्याऐवजी केवळ ३ गुण मिळतील हे लक्षात ठेवले पाहिजे. तसेच ही वाढ १५% व १९% च्या दरम्यान असेल तर १० गुणांच्याऐवजी केवळ ६ गुण मिळतील. आणि २० ते २४% वाढ असल्यास १० गुणांच्याऐवजी केवळ ८ गुण मिळतील. त्याची माहिती असली पाहिजे. शिवाय १०% पेक्षा कमी वाढ असल्यास ० गुण मिळतील.

**ठेवीमधील वाढ ही मागील वर्षाच्या तुलनेत २५ पेक्षा जास्त झाल्यास २०० पैकी १० गुण मिळतील अन्यथा वरील भाग-भांडवलाप्रमाणेच ८, ६, ९ व ३ एवढेच गुण त्या त्या प्रमाणात मिळतील.**

**थकबाकीचे प्रमाण ५% पेक्षा कमी असल्यास १५ गुण मिळतील. व ५% पेक्षा अधिक थकबाकी असल्यास प्रत्येकी १ टक्क्यास २ गुण कमी मिळतील.** एकंदरीत भाग-भांडवल, ठेवीतील वाढ व थकित वाढ व थकित कर्जे ह्या महत्त्वाच्या कामकाजासाठी ३५ गुण मिळविण्यासाठी पतसंस्थांना फार परिश्रम करावे लागणार आहेत. व त्यामध्ये थकबाकी ५% पेक्षा कमी आणणे ही बाब अशक्यप्राय असल्यामुळे सद्य अर्थव्यवस्थेतील व सर्व परिस्थिती लक्षात घेऊन थकबाकी वसुलीसाठी विविध मार्ग अवलंबण्याची गरज आहे.

वेळ अजूनही गेलेली नाही. पतसंस्थांनी ज्या कर्जदारांचा एक हप्ता किंवा त्याहून जास्त हप्ते थकले असतील,त्यांना ताबडतोब नोटीस पाठवून थकबाकी वसुलीची कारवाई चालू करावी व कलम १०१ अन्वये १००% थकबाकीदारांवर कारवाई करावी. जेणेकरून या कारवाईमध्ये आपल्या संस्थेस लेखापरिक्षणाच्या वेळी ५

गुण मिळतील. पतसंस्थेने कर्जवाटप हे किती करावयास पाहिजे हे आपण सर्वांनी नियमाप्रमाणे ज्ञात करून घेतले पाहिजे. पतसंस्थेने वसुल केलेले भाग–भांडवल, जमा केलेल्या सर्व प्रकारच्या ठेवी व बाहेरून उभारलेली कर्जे (म्हणजेच जिल्हा बँकेचे कर्ज) ह्यांची बेरीज करून जी रक्कम येते त्यास ''उपलब्ध निधी'' असे समजावे व अशा उपलब्ध निधीच्या ६५ ते ७०% दरम्यान कर्ज वाटप म्हणजेच ३१ मार्च २००५ रोजी मुद्दलाची येणे रक्कम असावयास पाहिजे. व त्यामुळे लेखापरिक्षणाद्वारे आपल्या पतसंस्थेस ५ गुण मिळतील अन्यथा ० गुण मिळतील.

लिक्विडिटी (तरलता) पोटी २० ते २५% गुंतवणूक जिल्हा बँकेत / निबंधकाच्या परवानगीने इतरत्र केल्यास ५ गुण मिळतील.

**केलेले कर्ज वाटप ६०% पेक्षा अधिक ''तारण कर्जे'' असल्यास ५ गुण मिळतील. व ४० ते ६०% पर्यंत ''तारणे कर्जे'' असल्यास केवळ ३ गुण मिळतील. अन्यथा ० गुण मिळतील.** कर्ज व्यवहार करताना कर्ज अर्जाची छाननी, कर्जदारांची सांपत्तीक स्थितीची छाननी, उपविधीप्रमाणे कर्ज पुरवठा, दस्तऐवज, मुद्रांक शुल्क, तारण मालाची तपासणी, विक्री योग्य पुरेसे तारण घेणे, तारणावर पतसंस्थेचा बोजा नोंदविणे व दिलेल्या कर्जाचा विनियोग योग्यरित्या कर्जदाराने केलेला आहे किंवा नाही हे तपासणे या प्रत्येक मुद्यांसाठी केवळ अर्धा गुण मिळेल. व एकूण जास्तीत जास्त ४ गुण मिळतील.

पतसंस्थेस किती नफा मिळावा व पतसंस्थेचे व्यवस्थापकीय खर्च किती करावा यासाठी सुध्दा नियम आहेत. संस्थेस मिळालेला निव्वळ नफा हा एकूण खेळत्या भांडवलाच्या १% पेक्षा अधिक असल्यास ३ गुण मिळतील. व अर्धा टक्के असल्यास केवळ १ गुण मिळेल. शिवाय व्यवस्थापकीय खर्च एकूण खेळत्या भांडवलाच्या २% पेक्षा जास्त असता कामा नये. अन्यथा या ठिकाणी सुधा ० गुण मिळतील.

पतसंस्थांना व्याजदराच्या बाबतीत नेहमीच मोठ्या संकटांना सामोरे जावे लागत आहे. ठेवीवरील व कर्जावरील व्याज प्रत्येक वेळी बदलल्यामुळे सर्वांचीच अडचण झालेली आहे. परंतु परिस्थितीशी सामोरे जाणे क्रमपात्र आहे. म्हणून ठेवीदारांना ११% पेक्षा जास्त व्याज न दिल्यास व कर्जावर १५% पेक्षा जास्त व्याज न आकारल्यास प्रत्येकी ३.५% असे एकूण ७ गुण मिळतील अन्यथा दोन्ही ठिकाणी ० गुण मिळतील हे लक्षात ठेवावे. या महत्त्वाचे म्हणजे ११% पेक्षा कमी किती टक्के व्याज ठेवींवर द्यावे व १५% पेक्षा कमी किती टक्के कर्जावर व्याज आकारावे हा आपापल्या संस्थेने निर्णय स्वत: घ्यावयाचा आहे. यासाठी संचालक मंडळ सर्व साधारण सभेच्या मान्यतेचे योग्य ते निर्णय घेऊ शकतात. व ह्यासाठी निबंधकाच्या परवानगीची आवश्यकता नाही.

सर्व प्रकारच्या सभा, हिशोब ठेवणे, नियंत्रण, नोकर भरती,कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण, सहकार खात्याकडे आर्थिक पत्रके व माहित्या वेळेवर पाठविणे, स्थावर जंगम मालमत्ता सहकार खात्याच्या पुर्व मंजुरीने खरेदी किंवा विक्री व दोषदुरूस्ती अहवाल मुदतीत पाठविणे या प्रत्येकी मुद्दयासाठी १ गुण दिलेला आहे. व असे एकूण

कारणासाठी ८ गुण आहेत. या प्रकरणी कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे ही बाब अतिमहत्त्वाची आहे. **महाराष्ट्र राज्य सहकारी संघाच्या अधिपत्त्याखालील मुंबई सहकारी बोर्डाच्या माध्यमातून आवश्यक ते प्रशिक्षण कर्मचाऱ्यांना देणे क्रमपात्र आहे. व कर्मचारी प्रशिक्षित झाल्यानंतर तसे प्रमाणपत्र मुंबई सहकारी बोर्डाकडून मिळवून पतसंस्थेच्या दफ्तरी लेखापरिक्षणाच्या वेळी उपलब्ध करून दिले पाहिजे.** अन्यथा पतसंस्थेस २०० पैकी १८० गुण जरी मिळाले तरी ''अ स्टार'' वर्ग मिळणार नाही. त्यामुळे कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे व अधिकृत प्रमाणपत्र मिळविणे किती महत्त्वाचे आहे, हे आपल्या सर्वांच्या लक्षात येईल. शिवाय कर्मचारी प्रशिक्षित झाले, पदाधिकारी व संचालक प्रशिक्षित झाले, तर आपल्या पतसंस्थेस कोणीही फसविण्याची,फरफटत नेण्याची, अगंतुक सहकारात नेतृत्व करणारे, पैशांच्या जोरावर संस्थांना खोटे चित्र उभे करणारे, तकलादू लोकांपासून संस्थेची सुटका होईल. अलिकडे अशा प्रवृत्ती सहकारी संस्थांना व इतर सहकारी संस्थांना सुध्दा अमिषे, भूल-भुलैया दाखवून गैरफायदा उचलताना दिसतात, परंतु प्रशिक्षण एकदा झाले तर बेगडी व सहकारात अचानक उपटलेले लोक आपणांस फसविण्यासाठी धाडस करू शकणार नाहीत.

पतसंस्थेच्या राखीव निधीची १००% गुंतवणूक ''**स्वतंत्रपणे केल्यास**'' २ गुण मिळतील व इतर निधींची गुंतवणूक ''**स्वतंत्रपणे केल्यास**'' आणखी २ गुण मिळतील. अशी एकूण गुंतवणूकीसाठी वरिलप्रमाणे ४ गुण मिळतील, अन्यथा ० गुण मिळतील. परंतु राखीव निधी सोडून इतर निधींची व्याख्या समजून या ठिकाणी आवश्यक आहे. इतर निधींमध्ये बुडीत व संशयीत कर्ज निधी, कर्मचारी कल्याण निधी, कर्मचारी भविष्य निधी, कर्मचारी उपदान निधी, पतस्थिरीकरण निधी (CREDIT STABILIZATION FUND), लाभांश संतुलन निधी, विकास निधी, गुंतवणूक चढ-उतार निधी, जोखिम निधी, स्वेच्छा निवृत्ती योजना निधी, धर्मादाय निधी, सामाजिक परिवर्तन व आर्थिक विकास निधी इत्यादी निधी येतात.

पतसंस्थेचे हिशोबी कामकाज व लेखा हे नियमानुसार सुव्यवस्थित ठेवणे आवश्यक आहे. येणे-देणे याद्या, मेळपत्रके, रोख, शिल्लक रोकड मालमत्ता व कामाचे वाटप या प्रत्येक मुद्दयास १ गुण मिळतो. असे एकूण या कामकाजास ५ गुण मिळतात. बऱ्याच वेळा रोख शिल्लक विहित मर्यादेच्या बाहेर राहते. पतसंस्थेच्या उपविधीप्रमाणे मर्यादा ओलांडू नये व रोकड व मालमत्ता याचा ताबडतोब विमा उतरविला पाहिजे. अन्यथा त्या त्या मुद्दयाचे प्रत्येकी १-१ गुण मिळणार नाहीत. शिवाय संस्थेच्या सुरक्षिततेसाठी ही बाब अत्यावश्यक आहे.

''संशयित बुडीत फंडाची तरतुद'' यापासून काही पतसंस्था दूर असल्याचे दृष्टीक्षेपात येते. एवढेच नव्हे तर संशयित बुडीत फंड कसा काढावा, कशासाठी काढावा याचे प्रशिक्षण घेणे अत्यंत आवश्यक आहे. कारण नवीन एन.पी.ए. ही संकल्पना पतसंस्थांसाठी ३१ मार्च २००५ पासून लागू करण्यात आलेली आहे. सी. डी. रेशो ६०ते ७०% च्या दरम्यान असणे, पतसंस्था नफ्यात असणे यासाठी अनुक्रमे ४० व ३० गुण मिळतात. व थकबाकीचे

प्रमाण ५% पेक्षा कमी असल्यास ३० गुण मिळतात. आणि या तीन महत्त्वाच्या मुद्दयावरच लेखापरिक्षणाच्या २०० गुणांपैकी १०० गुण आरक्षित करण्यात आलेले आहेत आणि हे तिन्ही मुद्दे एकमेकांशी व इतर उर्वरित १७ मुद्दयांशी संबंधित आहेत. हे तीन मुद्दे जर पुर्तता केली तर सदरहू पतसंस्थेस किमान ''ब'' वर्ग व त्याहूनही अधिक ''अ'' वर्ग सहज मिळू शकतो ''अ स्टार'' हा वर्ग एखाद्या पतसंस्थेस मिळणे ही बाब अत्यंत प्रशंसनिय आहे. व त्यासाठी सर्वांचे कौशल्य, मेहनत, सांघिकपणा याचे एकत्रित दर्शन होते. परंतु पतसंस्था जस-जशी मोठी होत जाईल तस-तशी आव्हाने मोठ-मोठी येत असतात व त्यातून सातत्याने मार्ग काढणे आवश्यक आहे.

**२३/०५/२००३ रोजी राज्याचे सहकार आयुक्त व निबंधक श्री उमेशचंद्र सारंगी** यांनी एक परिपत्रक काढून ज्या नागरी / ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था तसेच पगारदार सेवकांच्या पतसंस्था यांचे खेळते भाग-भांडवल एक कोटी किंवा ठेवी एक कोटीच्या वर असतील अशा सर्व पतसंस्थांचे लेखापरिक्षण प्रमाणित चार्टर्ड अकाऊटंट पॅनलमधील सी.ए. यांनी करावे असे जाहिर केले. त्यामुळे महाराष्ट्र शासनाच्या सेवेत असणारे लेखापरिक्षक यांना एक कोटीच्या खाली असणाऱ्या पतसंस्थांचे लेखापरिक्षण करण्याची केवळ जबाबदारी पडलेली आहे. तसेच एक कोटींच्या वरील पतसंस्थांचे लेखापरिक्षणाचे काम मिळणेसाठी मुंबईसह राज्यात गेल्या वर्षापासून आर्थिक जीव घेणी स्पर्धा खुलेआम सर्व स्तरावर राजरोसपणे चालू आहे. आणि त्याचा भुर्दंड पतसंस्थांनासुध्दा ह्याही परिस्थितीत बसू लागला आहे. कोणी सर्व्हिस चार्जेस मागतात तर कोणी इतर चार्जेस मागतात. व तसे लेखी पत्र सुध्दा पतसंस्थांना देतात. सहकार आयुक्तांनी या बाबी पत्रकाद्वारे स्पष्टपणे जाहीर करायला पाहिजे. आणि पतसंस्थांचे जाहिर व छुपे शोषण जागी थांबविले पाहिजे. दैनिक वर्तमानपत्रामध्ये शासनाच्या वतीने याबाबत बातम्या प्रसिध्द केल्या पाहिजेत. केव्हातरी चांगल्या कामासाठी आपल्या अधिकाराचा वापर पतसंस्थेमध्ये काम करणाऱ्या कार्यकर्त्यांसाठी सहकार आयुक्तांनी करणे आवश्यक आहे. अधिकाररूपी मनगटातील जोर पतसंस्थांतील कार्यकर्त्यांच्या विरोधात व ही चळवळ कमकुवत करण्यासाठी येथून पुढे तरी थांबणे आवश्यक आहे. ''**राजाचे काम रयतेच्या हितासाठी असले पाहिजे.**'' छत्रपती शिवरायांचा, राजर्षी शाहू, आंबेडकरांचा आणि क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांचा हा महाराष्ट्र अन्याय गिळंकृत करून निमूटपणे सहन करणाऱ्यांचा नाही. पद्मभूषण सहकार महर्षी वसंतदादा पाटील, डॉ. धनंजय गाडगीळ, वि.खे.पाटील, यशवंतराव चव्हाण साहेबांचा हा सुसंस्कृत महाराष्ट्र सहकाराच्या माध्यमातून जडविण्याचे व वाढविण्याचे काम पतसंस्थांनी या राज्यात निश्चितपणे केलेले आहे. पाच लाखांपेक्षा जास्त बेरोजगारांना नोकऱ्या उपलब्ध केलेल्या आहेत. येथून पुढे तरी पुणे येथील सहकार खात्याच्या मुख्य कार्यालयातून लहरी महम्मदाची, जुलमी, अन्यायकारक, हुकूमशाही व भ्रष्टाचारी कार्यपध्दती थांबली पाहिजे.

**पतसंस्थांसाठी केव्हाही, कशीही परिपत्रके विचार व चर्चा न करता काढणे आता थांबविणे आवश्यक आहे.** सहकारी पतसंस्थांना, बँकांना जसे पुढील वर्षासाठी अंदाजपत्रके वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये मंजूर करावे

लागते, तसे काम वर्षातून एकदा पुणे येथील सहकार आयुक्त कार्यालयांनी करण्याची गरज आहे. चांगल्या संकल्पना राबविण्यासाठी ह्या राज्यात संबंधितांकडे मशिनरी उपलब्ध आहे का ? याचा विचार येथून पुढे तरी करणे आवश्यक आहे. गेले तीन वर्षांपासून सहकार खात्यातील सर्व स्तरावरील अधिकारी ह्या कार्यपध्दतीमुळे मेटाकुटीस आलेले होते. पहिले काम संपण्याच्या अगोदरच दुसरे व तिसरे काम देऊन संभ्रमाच्या पलिकडे काही झाले नाही. येथून पुढे तरी सहकार चळवळीत ज्यांनी नेतृत्व केले त्या फेडरेल संस्था यांना त्या त्या स्तरावर चर्चेमध्ये सहभागी करून घेणे आवश्यक आहे. सहकारात काल लोकांसमोर आलेले दलाल या चळवळीत कसे काय नेतृत्व करू शकतात ? व पैशाच्या जिवावर संबंधित सहकारी यंत्रणा कशी काय ताब्यात ठेवली जाते ? ह्या चळवळीतील कार्यकर्ते कोणाचे वेठबिगार नाहीत व कोणाच्या धमकीला किंवा अमिषाला आहारी जाणार नाहीत, हा इतिहास या चळवळीचा आहे. हे संबंधितांनी वेळीच ज्ञात करून घ्यावे.

सी.डी.रेशो, एन.पी.ए., कर्ज वाटपास उपलब्ध निधी, गुंतवणूक व थकित कर्जाच्या वसुलीची कारवाई याचे प्रशिक्षण सहकारी संस्थांमधील कर्मचारी, संचालक-पदाधिकारी यांचेबरोबर राज्याचे सहकार आयुक्तांपासून वॉर्ड/तालुका स्तरावरील सहनिबंधक/उपनिबंधक व त्यामधील अधिकारी यांनी महाराष्ट्र राज्य सहकारी संघ, विभागीय मंडळे व जिल्हा सहकारी बोर्ड यांचे माध्यमातून अत्यल्प शुल्काद्वारे त्वरीत घ्यावे. त्यासाठी संबंधित यंत्रणा सेवेसाठी उपलब्ध आहेच. त्वरीत मागणी करून प्रशिक्षण घ्यावे. कारण विद्यार्थ्यांना शिकविण्याच्या अगोदर अध्यापकाने शिकून घेणे नैतिकतेला धरून आहे, हे सांगण्याची वेळ आलेली आहे.

एकंदरीत ३१ मार्च २००५ जवळ येत असताना आपल्या पतसंस्था लेखापरिक्षणाच्या परीक्षेत वरच्या वर्गवारीमध्ये याव्यात यासाठी सर्वांनी प्रयत्नांची पराकाष्ठा करावी व स्वकर्तृत्वाने ही आव्हाने स्विकारून पार करावी ह्याच नवीन वर्षाच्या माझ्या शुभेच्छा!

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**